ePaper

# महाकुंभ-2025 : 250 तंबू जळून खाक, सिलिंडरच्या स्फोटाने सारं काही अस्ताव्यस्त




|| वर्ष - 8 | अंक -190 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 20 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


### आतील पानांत


- भारत खो-खो वर्ल्ड चॅम्पियन
- टीम इंडियाचा 26 बॉलमध्येच विजय!
- ओलिसांची सुटका होईल, युद्ध थांबेल!
- वर्ल्डकपआधी धक्कादायक निर्णय


## ‘पर्पल जल्लोष 2025’ चा समारोप

# प्रत्येक घटकाचा विचार विकसित भारताचे स्वप्न!

## राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन: भारत निश्चितच एक आदर्श देश म्हणून जगासमोर येईल!

| पिंपरी | महाईन्यूज

**‘विकसित भारताचे स्वप्न आपल्या सर्वांना पूर्ण करायचे आहे. जगातील सर्वात सक्षम देश म्हणून भारताला पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न गरजेचे आहे. आपण समाजातील प्रत्येक घटकाच्या गरजा ओळखून त्यांना एकत्रित घेऊन पुढे गेलो तर भारत निश्चितच एक आदर्श देश म्हणून जगासमोर येईल. यामध्ये प्रत्येकाचे योगदान महत्वाचे असून कोणतेही काम करताना फळाची अपेक्षा न करता ते काम प्रामाणिकपणे केल्यास यश नक्की मिळेल, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महापालिका दिव्यांग भवनाच्या वतीने १७ ते १९ जानेवारी या कालावधीत ‘पर्पल जल्लोष’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा समारोप राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार अमित गोरखे, पद्मश्री मुरलीकांत पेटकर, राज्याच्या दिव्यांग कल्याण आयुक्तालयाचे दिव्यांग कल्याण आयुक्त प्रवीण पुरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उप आयुक्त अण्णा बोदडे, तानाजी नरळे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, दिव्यांग भवनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी उपस्थित होते.

राज्यपाल यावेळी म्हणाले, पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग भवन फाऊंडेशन यांनी दिव्यांगांच्या उत्कर्षासाठी, विकासासाठी जे पाऊल उचलले आहे ते कौतुकास्पद आहे. दिव्यांग व्यक्तींच्या प्रबळ इच्छाशक्तीचा केलेला सन्मान कौतुकास्पद आहे. एखाद्या उद्योगाला मानवी भावनांची जोड मिळाली तर प्रगती करणे सहज शक्य होते याचा प्रत्यय आला,

> ‘दिव्यांग बांधवांचे उत्कर्ष आणि विकासाला केंद्रबिंदू मानत ‘पर्पल जल्लोष’ हा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने महाराष्ट्रात सर्वात प्रथम दिव्यांगांसाठी दिव्यांग भवन सुरू केले. याठिकाणी २१ प्रकारच्या दिव्यांगत्वावर मोफत सल्ला व मार्गदर्शन, विविध प्रकारच्या थेरपी, कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार असे विविध उपक्रम फाऊंडेशनच्या माध्यमातून सुरू आहेत.
>
> -शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक पिंपरी चिंचवड महापालिका

> पर्पल जल्लोष सोहळा म्हणजे समाजाची संघटीत प्रगतीचे एक उत्तम उदाहरण आहे. जन्मजात दिव्यांगांना लवकरात लवकर मदत मिळावी, उपचार मिळावेत, यासाठी निधी देऊन तो लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. आपल्याकडे जे काही कलागुण आहेत, त्याचा योग्य वापर करून पुढे जात रहावे. समाजिक बांधिलकी जोपासून आपल्याकडून ज्या पद्धतीने मदत करणे शक्य होईल ती करावी,’
>
> -सी.पी.राधाकृष्णन , राज्यपाल

## मावळातील पाणी वाटपावरून ग्रामस्थ आक्रमक!

### आंद्रा धरणातून पाणी विसर्ग करताना योग्य नियोजन करा; आंदर मावळातील ग्रामस्थांची मागणी

| पिंपरी | प्रतिनिधी : महाईन्यूज

**धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्याने परिसरातील गावांना भेडवणारी पाणीटंचाई तसेच पाणी दूषित होण्याची शक्यता टाळण्यासाठी आंद्रा धरणातून पाणी विसर्ग करताना योग्य नियोजन करावे, अशी मागणी आंदर मावळातील ग्रामस्थांनी तहसीलदार विक्रम देशमुख व पाटबंधारे विभागाचे शाखाधिकारी यांच्याकडे केली आहे.**



यासंदर्भात संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष नारायण ठाकर, काळुराम मालपोटे, सरपंच भिकाजी भागवत, शिवाजी करवंदे, माजी सरपंच बळीराम भोईरकर, काळुराम भोईरकर, दिगंबर आगिवले, बुधाजी जागेश्वर, भारत आडीवळे, अजित कडू, रवींद्र पवार, पंडित खापे, सुरज आडीवळे, मोनिकेत आडीवळे, पंढरीनाथ तलावडे, भागवत भोईरकर आदींनी तहसीलदार देशमुख यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे, की मावळ तालुक्यात आंदर मावळ विभागामध्ये आंद्रा धरण आहे. या धरणातून अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजना आहेत. अनेक शेतकरी आपल्या शेतीसाठी या धरणातून पाणी वापर करत असतात. छोटे मोठे उद्योग, व्यवसाय या धरणातील पाण्यावर अवलंबून आहेत. एमआयडीसीसाठी सुद्धा याच धरणातून पाणीपुरवठा होत आहे. औद्योगिक परिसरासाठीसुद्धा या

### तहसीलदारांना निवेदन

परिसरातील गावांना पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत आहे. तुलनेने छोटे असलेल्या या धरणातून अतिरिक्त पाणी सोडल्याने दूषित पाण्याची समस्यासुद्धा निर्माण होणार आहे. त्यामुळे धरण परिसरातील लोकांना अनेक साथीच्या रोगांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. त्यासाठी एप्रिल, मे, जूनमध्ये बॅक वॉटरमध्ये असणाऱ्या गावांना पाणीटंचाई जाणवणार नाही, याद्दष्टीने आंद्रा धरणातून पाणी सोडताना योग्य नियोजन करण्यात यावे, असे निवेदनात म्हटले आहे.

# मुळशी धरणग्रस्तांसाठी कारागृहात जाऊ

## ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांचा इशारा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होऊन गेली. मुळशीकरांना मत मिळाले, पण पत मिळाली नाही. हक्काचे घर आणि गावठाण मिळाले नाही,' अशी खंत व्यक्त करून कामगार चळवळीतील ज्येष्ठ नेते, हमाल पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांनी, 'मुळशी धरणग्रस्तांसाठी आता पुन्हा सत्याग्रह करावा लागेल, याची तयार ठेवू या. वयाची सबब मी मुळीच देणार नाही. मुळशी धरणग्रस्तांच्या मागण्यांसाठी पुन्हा कारागृहात जायला तयार आहे,' असा इशारा दिला.**



मुळशी सत्याग्रहाच्या शताब्दीनिमित्त मुळशी धरणग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या आणि राज्यातील अन्य धरणग्रस्तांसोबत संवाद व्हावा, यासाठी आयोजित अखिल महाराष्ट्र मुळशी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. आयोजक अनिल पवार यांनी संपादित केलेल्या 'सह्याद्रीचे अश्रू : धरणग्रस्त विस्थापितांचा संघर्ष' या ग्रंथाचे प्रकाशनही डॉ. आढाव यांच्या हस्ते झाले. नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर, डॉ. भारत पाटणकर, डॉ. सदानंद मोरे, श्रीपाद धर्माधिकारी, सुनीती सु. र., लेखक कृष्णात खोत, विंदा भुस्कुटे, विजय भुस्कुटे आणि धरणग्रस्तांच्या हक्कांसाठी लढा उभारणारे नेते-कार्यकर्ते उपस्थित होते.डॉ. आढाव म्हणाले, 'मुळशीकरांच्या रक्तात सत्याग्रह आहे. शंभर वर्षांनंतरही मुळशी धरणग्रस्तांच्या मागण्या प्रलंबित आहेत. कुकडी धरणावेळी केलेल्या आंदोलनात पोलिसांशी झालेल्या झटापटीत माझ्या एका डोळ्याला इजा झाली. धरणाच्या भूमिपूजनाला यशवंतराव चव्हाण आले होते. धरणग्रस्तांचा प्रश्न सोडवतो, नंतर धरण बांधतो, असे चव्हाण यांनी जाहीर केले. या आंदोलनानंतर महाराष्ट्रात पुनर्वसन कायदा लागू झाला. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. मुळशी धरणग्रस्तांसाठी घेतलेले निर्णय कागदावरच राहिले आहेत. त्यांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे.'

'पुनर्वसन म्हणजे फक्त आर्थिक भरपाई नाही. आम्ही माणूस म्हणून जगत होतो. आम्हाला माणूस म्हणून स्वतःच्या पायांवर उभे राहण्याचा अधिकार आहे. तो अधिकार मिळवून देणे म्हणजे पुनर्वसन. बड्या उद्योगपतींना हवी तेवढी जमीन मिळते. मग आम्ही काय जनावरे आहेत का,' असा प्रश्न या वेळी पाटणकर यांनी विचारला.'मुळशी सत्याग्रह ही प्रस्थापित विरुद्ध विस्थापित अशी लढाई होती. वंचित आणि शोषितांचाही संघर्ष होता. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना मुळशी धरणग्रस्त न्यायाच्या प्रतीक्षेत असणे अत्यंत दुर्दैवी आहे. विनायकराव भुस्कुटे, सेनापती बापट यांनी उभा केलेला हा लढा आमच्या नर्मदा बचाव आंदोलनासाठीही नेहमीच प्रेरणादायी ठरला,' असे पाटकर यांनी नमूद केले. 'जल, जमीन, जंगल यांवर पहिला अधिकार स्थानिकांचा असतो. त्यासाठी कायदादेखील आहे. या कायद्याच्या आधारे मुळशी धरणग्रस्तांचा प्रश्न ताबडतोब सोडवण्याचा कृती कार्यक्रम ठरवण्यासाठी परिषद होत आहे,' असे धर्माधिकारी यांनी सांगितले. 'मुळशी व महाराष्ट्रातील अन्य धरणग्रस्तांचे लढे' या परिसंवादात बबन मिंडे, विलास भोंगाडे, संपत देसाई, दिलीप देशपांडे, सुनील मोहिते, प्रसाद बागवे, देवदत्त कदम, प्रफुल्ल कदम यांनी राज्यात विविध भागांत सुरू असलेल्या धरणग्रस्तांच्या आंदोलनातील अनुभव सांगितले. पवार यांनी प्रास्ताविक केले. चेतन कोळी यांनी सूत्रसंचालन केले.'धरणात मुळशीकरांची जमीन, घरे, शेती बुडाली. मुंबईसारख्या औद्योगिक राजधानीची क्रांती मुळशी धरणावरील विद्युतनिर्मिती प्रकल्पामुळे झाली. मुंबईच्या, पर्यायाने भारताच्या औद्योगीकरणासाठी मुळशीकरांचे योगदान फार मोठे होते व आहे.

### मुळशीकरांच्या रक्तात सत्याग्रह आहे

मुळशी सत्याग्रहाच्या शताब्दीनिमित्त मुळशी धरणग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या आणि राज्यातील अन्य धरणग्रस्तांसोबत संवाद व्हावा, यासाठी आयोजित अखिल महाराष्ट्र मुळशी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. आयोजक अनिल पवार यांनी संपादित केलेल्या 'सह्याद्रीचे अश्रू : धरणग्रस्त विस्थापितांचा संघर्ष' या ग्रंथाचे प्रकाशनही डॉ. आढाव यांच्या हस्ते झाले. नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर, डॉ. भारत पाटणकर, डॉ. सदानंद मोरे, श्रीपाद धर्माधिकारी, सुनीती सु. र., लेखक कृष्णात खोत, विंदा भुस्कुटे, विजय भुस्कुटे आणि धरणग्रस्तांच्या हक्कांसाठी लढा उभारणारे नेते-कार्यकर्ते उपस्थित होते.डॉ. आढाव म्हणाले, 'मुळशीकरांच्या रक्तात सत्याग्रह आहे. शंभर वर्षांनंतरही मुळशी धरणग्रस्तांच्या मागण्या प्रलंबित आहेत. कुकडी धरणावेळी केलेल्या आंदोलनात पोलिसांशी झालेल्या झटापटीत माझ्या एका डोळ्याला इजा झाली.

# संक्रातीनंतर फळभाज्यांना मागणी कमी

## टोमॅटो, काकडी, पापडी, कोबी, शेवगा, मटारच्या दरात घट

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संक्रातीनंतर फळभाज्यांना मागणी कमी झाली असून, घाऊक बाजारात टोमॅटो, काकडी, पापटी, कोबी, शेवगा, ढोबळी मिरची, वालवर, घेवडा, मटार या फळभाज्यांच्या दरात १० ते २० टक्क्यांनी घट झाली. आवक कमी झाल्याने गेल्या आठवड्याच्या तुलनेत कांद्याच्या दरात वाढ झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.**



श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्यात संक्रात होती. संक्रातीला भाज्यांची मोठी आवक बाजारात झाली होती. संक्रातीनंतर फळभाज्यांना अपेक्षित मागणी नसल्याने दरात घट झाल्याची माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ८ ते १० टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटकातून घेवडा आणि पावटा प्रत्येकी ५ ते ६ टेम्पो, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ५ ते ६ टेम्पो शेवगा, राजस्थानातून १४ ते १५ टेम्पो गाजर, मध्य प्रदेशातून १८ ते २० ट्रक मटार, तमिळनाडूतून १ टेम्पो तोतापुरी कैरी, मध्य प्रदेशातून ८ ते १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली.पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, भेंडी ७ ते ८ टेम्पो, गवार ४ ते ५ टेम्पो, टोमॅटो १० ते १२ हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, काकडी ८ ते १० टेम्पो, कोबी ४ ते ५ टेम्पो, फ्लॉवर १० ते १२ टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा ७० ते ७५ ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ४० ते ४५ टेम्पो बटाट्याची आवक झाली.

### पालेभाज्यांच्या दरात घट

करडई, पुदिना, राजगिरा, चुका, पालक, अंबाडी, मुळे, राजगिरा, चवळई, पालक आणि हरभरा गड्डीच्या दरात १० ते २० टक्क्यांनी वाढ झाली. तरकारी विभागात कोथिंबीर एक लाख २५ हजार जुडी, मेथीच्या ७० हजार जुडी, तसेच हरभरा गड्डीची १५ ते २० हजार जुडीची आवक झाली अंबाडी – ४०० ते ६००, मुळे – ८०० ते १०००, राजगिरा- ४०० ते ६००, चुका – ५०० ते ८००, चवळई- ८००-१०००, पालक- ८००-१०००. हरभरा गड्डी – ५०० ते १०००

## पिंपरी-चिंचवडमध्ये पर्यावरणप्रेमी

# सायकलस्वारांचा "कुंभमेळा"!

## इंद्रायणी नदी संवर्धन जागृतीसाठी 35 हजार सायकलपटूंची रॅली



## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचा विश्वविक्रमी उपक्रम

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**इंद्रायणी नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन जागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन-2025"निमित्ताने भोसरीमध्ये पर्यावरण प्रेमींचा अक्षरशः कुंभमेळा भरला. सुमारे 35 हजार पर्यावरण प्रेमी, नागरिक, सायकलस्वार या रॅलीमध्ये सहभागी झाले. भोसरी येथील ऐतिहासिक गावजत्रा मैदानावर विश्वविक्रमी सायकल फेरी उत्साहात आणि निर्विघ्नपणे संपन्न झाली.**

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, अविरत श्रमदान, सायकल मित्र पुणे, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, शिवांजली सखी मंच, सारथी हेल्पलाईन यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्था, संघटना आणि पर्यावरण प्रेमी स्वयंसेवकांच्या पुढाकाराने "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन-2025" चे आयोजन करण्यात आले.

यावेळी उत्तरप्रदेश येथील प्रभू श्रीराम मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज, ह.भ.प. संग्रामबापू पठारे महाराज, खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

गेल्या वर्षी सायकल पटूंची सर्वात मोठी रांग म्हणून रेकॉर्ड स्थापित केलेल्या या उपक्रमाने यंदाही स्वतःचेच रेकॉर्ड मोडले. तीर्थक्षेत्र प्रयाग येथे भरलेल्या कुंभमेळ्याप्रमाणे भोसरीमध्ये रविवारी पर्यावरण प्रेमींचा महामेळा भरल्याचे चित्र होते. सकाळी पाच वाजल्यापासून भोसरीमध्ये चैतन्याचे वातावरण सळसळत होते. मान्यवरांच्या हस्ते भगवा झेंडा दाखवल्यानंतर या सायकल स्पर्धेला सुरुवात झाली. रॅलीमध्ये 5 , 15 आणि 25 किलोमीटर असे अंतर कापत सायकल पटूंनी शहरामध्ये पर्यावरणाची चळवळच उभी केली. प्रतिवर्षी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' मोफत आयोजित केली जाते. यंदा सायक्लोथॉंचे 9 वे वर्ष आहे. वाहतूकीचे नियम, रस्ता सुरक्षा या थीमवर आधारित इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' आयोजित केली. रॅलीमध्ये सहभागी सायकलपटूंना टी-शर्ट, मेडल आणि नाष्टाची व्यवस्था करण्यात आली होती.

## दिव्यांग बांधवांचा सहभाग प्रेरणादायी...

यावर्षीच्या इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉनमध्ये दिव्यांग बांधवांचा सहभाग लक्षवेधी आणि प्रेरणादायी ठरला. महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने आयोजित 'पर्पल जल्लोष' कार्यक्रमाची झलक सायक्लोथॉनमध्ये दिसली. विशेष म्हणजे, इंद्रायणी नदीबाबत कृतज्ञता व्यक्त करीत गंगा आरती करण्यात आली. आगामी काळात इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प आणि नागरिकांमध्ये जनजागृती करुन नदीचे गतवैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठी एजकुटीने काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तसेच, झुंबा डान्समध्ये आमदार महेश लांडगे यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी, अधिकाऱ्यांनी ठेका धरला.



> नदी संवर्धन म्हणजे शहराच्या निरामय आरोग्याचा गाभा आहे. नागरिक, सामाजिक संस्था, प्रतिनिधी स्वयंस्फूर्तीने नदी संवर्धनासाठी एकवटतात. त्यावेळी शहराचे आरोग्य सुरक्षित होत जाते. "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन"सारख्या उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाची चळवळ उभी राहील. या रॅलीच्या यशस्वीतेसाठी झटलेल्या आणि सहभागी झालेल्या प्रत्येकाचे मनापासून आभार व्यक्त करतो. यंदाची रॅली महाकुंभ मेळ्याला समर्पित आहे. आपली संस्कृती आणि परंपरा यासाठी कटिबद्ध राहुयात, असे आवाहन करतो.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-

> गेली नऊ वर्ष पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन" हा उपक्रम राबवला जात आहे. अनेक संस्था या माध्यमातून नदी संवर्धनासाठी एकत्र आल्या. नागरिक, युवा जोडले गेले. नदी संवर्धन म्हणजे एक प्रकारे आपले भविष्य आरोग्यदायी करण्याचा मूलमंत्र आहे. ही प्रेरणा प्रत्येकाच्या मनात या माध्यमातून रुजवण्याचा आमचा प्रयत्न आहे. या उपक्रमात युवा वर्ग मोठ्या प्रमाणात जोडला जात असून युवकांच्या माध्यमातून नदी, पर्यावरण आणि आपले शहर नक्कीच स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचा प्रयत्न प्रत्यक्षात उतरणार आहे.
>
> **– शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.




'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# संकटात आहे सैफ, मुंबई आहे 'सेफ' !

**आज चार पाच दिवस उलटले.. प्रसिद्ध अभिनेता सैफ अली खान याच्या निवासस्थानी घुसून एका चोरट्याने त्याच्यावर जीवघेणा चाकू हल्ला केला. केवळ सुदैवाने सैफ अली खान बचावला. या हल्लेखोराचा उद्देश, तो अशा सुशिक्षित, श्रीमंतांच्या वस्तीत सुरक्षा रक्षकांचे कडे असलेल्या घरात शिरला कसा, त्याला कोणी मदत केली का, चोरीसाठी आला असेल तर त्याने सैफकडे काम करणाऱ्या महिलेकडे एक कोटी का मागितले, वगैरे सगळ्या गोष्टींचा तपास पोलीस करतील. कदाचित, मोठे धागेदोरे मिळाले असतीलही! एव्हाना तो हल्लेखोर पोलिसांच्या हाती लागलाही असेल. सैफवरील हल्ला ही गंभीर आणि दुर्दैवी बाब नक्कीच आहे. असे हल्ले, चोऱ्या, दरोडे होणे चुकीचेच किंवा निषेधार्ह. परंतु असे घडले म्हणून लगेच काही लोकांना आजकाल असुरक्षित वाटू लागले आहे. यात राजकारण आणले गेले असावे.**







फडणवीस सरकारवर, मुंबई पोलिसांवर विश्वास व्यक्त करण्याऐवजी किंवा अशा घटना टाळण्यासाठी यंत्रणांवर सामाजिक दबाव निर्माण करण्याऐवजी हे लोक सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करतात आणि लगेच दोष देण्यास सुरुवात करतात. सैफवरील हल्ल्याच्या वेळीही तेच झाले. काहीही माहिती नसताना, पोलिसांचा तपास अगदीच प्राथमिक पातळीवर असताना आणि सगळ्या यंत्रणा अंधारात चाचपडत असताना राजकीय नेत्यांनी सरकार आणि गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्यावर लगेच आरोपांच्या फैरी झाडून आपले तथाकथित कर्तव्य बजावण्यास सुरुवात देखील केली.

या घटनेची चर्चा करताना बॉलीवूडशी संबंधित काही घटनांचा संदर्भ देण्यात आला. मोठा कलाकार गुलशनकुमार यांच्या हत्येपासून अनेक काही उदाहरणे देण्यात आली आणि मुडदे पुन्हा उकरण्याचे उद्योग सुरु झाले. परंतु तेव्हाची परिस्थिती, अंडरवर्ल्डचा गुंतव गेलेला ला सिनेसृष्टीतील पैसा, दाऊद इब्राहिम गँगकडून खंडणी वसुलीसाठी करण्यात आलेले हल्ले, दाऊदच्या इशाऱ्यावर दुबईत जाऊन नाचणारे बॉलीवूडचे कलाकार, असे त्या घटनांचे धागेझकासपैकी विसरण्यात आले. तोच प्रकार गेल्या काही दिवसांत घडलेल्या दोन घटनांच्या बाबतीतही झाला आहे.

प्रसिद्ध अभिनेता सलमान खान याच्या घरावर झालेला गोळीबार आणि राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दीकी या माजी मंत्र्याचा खून या दोन घटना मुंबईला हादरवून सोडणाऱ्या होत्या, हे मान्य करायला हवे. पण, त्यामुळे मुंबई असुरक्षित आहे, असे म्हणणे योग्य वाटत नाही. सलमानवरील गोळीबाराचे नेमके कारण माहिती आहे. बाबा सिद्दीकी यांच्याही व्यवसाय आणि एकूणच त्यांची कथित उच्चभ्रू वर्तुळातील विशेषतः बॉलीवूडमधील उठबस कशासाठी होती, याबाबतही संभ्रम आहेच. या दोन्ही घटनांमागे काहीतरी पार्श्वभूमी होती, असे म्हणता येईल, तसा निष्कर्ष निघू शकतो !

## त्या घटनांचा संबंध बघा..

एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी.. गुन्हेगारी विश्वाकडून झालेल्या हल्ल्यात बळी गेलेले कुठेतरी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या त्यांच्याशी जुळलेले होते. कुठेतरी संगनमत किंवा व्यवहार होते. अचानक कोणी गँगस्टर उठला आणि त्याने गोळ्या झाडल्या, असे घडलेले नाही. हे सगळ्यांनाच माहिती असले तरीही होणारा फायदा आमचा आणि त्याची धग लागली तर सरकार आणि पोलीस जबाबदार ही भूमिका घेणाऱ्या राजकारणी आणि अभिनेत्यांना मग एखाद्या चोरट्याच्या हल्ल्यामुळे मुंबई असुरक्षित आणि मुंबई पोलीस नाकर्ते वाटू लागतात, याचे आश्चर्य वाटते.

आता, सैफ अली खानच्या फ्लॅटवरील हल्ल्यानंतर आलेल्या प्रतिक्रिया पाहिल्या तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यापासून सगळ्यांनी सरकारला लगेच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. मुंबईतील गुन्हेगारी घटनांबाबत गृहमंत्र्यांना किंवा सरकारला शरद पवार यांच्यासारख्या 'अनुभवी' नेत्याने जबाबदार ठरवण्याचा प्रयत्न करावा, हे खरे आश्चर्य आहे. दुसरीकडे त्यांचेच वाचाळ आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या हल्ल्याला लगेच सैफचा मुलगा तैमूरशी आणि त्यातून हिंदुत्ववाद्यांशी जोडण्याचा प्रयत्न केला.असाच प्रयत्न पाकिस्तानच्या एका माजी मंत्र्याने केला, याला आपण तरी योगायोग मानायला हवा ! पूजा भट्ट किंवा प्रकाशझोतापासून बरेच लांब असलेल्यांनी प्रतिक्रियेसाठी केलेली घाई कुठेतरी खटकल्याशिवाय राहात नाही. बीड जिल्ह्यातील सरपंचाच्या खूनप्रकरण र गाजत आहे, त्यात प्रतिक्रिया देणाऱ्यांपैकी अनेकजण नाहीत. मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरात चिमुकल्यांवर अत्याचाराच्या घटना प्रकाशझोतात आल्या, त्यावर कोणी निषेधाचा एक शब्द ट्विट करत नाही.

मुंबईची तरुण पिढी ड्रग्जच्या आहारी जाते आहे. कोट्यवधी रुपयांचे ड्रग्ज मुंबईत पकडले जाते. याचाच अर्थ तितके ड्रग्ज मुंबईत दाखल होते. नशेच्या आहारी गेलेल्या तरुणांच्या मदतीसाठी कोणी चकार शब्द काढत नाही. ड्रग्ज सिंडीकेटचा निषेध करण्याचे धारिष्ट्य कोणातच नाही, तो कितीही मोठा बॉलीवूडचा भाई असला आणि किंग असला तरीही, समाजासाठी काही करण्यासाठी पुढे येण्याच्या काळात फार्महाऊसवर जगापासून अलिप्त राहणाऱ्या लोकांनी हे शहर असुरक्षित आहे, असा कांगावा करावा, हे न पटण्यासारखे आहे, राजकीय फायद्यासाठी बिनबुडाचे आरोप सुरु आहेत.

## मुंबईने भरभरून दिले...

एक विचार करा, की जात, पात, धर्म, पंथ आणि देशाच्याही सीमा न पाळणाऱ्या ज्या शहराने या मूठभर लोकांना भरभरून दिले, त्यांच्या सगळ्या जुमलेबाजीकडे दुर्लक्ष करून मोठे केले, त्यांनीही या शहरातील सुरक्षिततेबद्दल आणि मुंबई पोलिसांबद्दल संशय व्यक्त करावा, हे खेदजनक आहे, हे नक्की!

मुंबईत कोट्यवधी लोक गुण्या गोविंदाने, अतिशय शांततेने राहतात. त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी मुंबई पोलीस आणि सरकार पार पाडते. चोरी, बलात्कार, दरोडे, हल्ले हे गुन्हे घडायला नकोच. या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी अधिक प्रयत्न व्हायला हवेत, हे नक्कीच खरे. पण गुन्हेगारी प्रवृत्ती कोणतेही सरकार आणि कोणतेही पोलीस हद्दपार करू शकत नाहीत. तरीही शहरातील असुरक्षित वाटणाऱ्या काही मूठभर लोकांना सरकारपासून अडचण असते, कधी त्यांना पोलिसांकडून सहकार्य मिळत नसते. कधी त्यांना इथल्या महापालिकेत अडचणी दिसतात. त्यावेळी अशी कोणती कामे या लोकांना सरकार, पोलीस, महापालिकेकडून करून देणे अपेक्षित असते ? किंवा अशा कोणत्या परवानग्या, परवाने त्यांना हवे असतात. काय असे आहे की त्यांच्या प्रतिमेपेक्षा प्रत्यक्ष काहीतरी वेगळे आहे आणि ते त्यांना लपवायचे आहे? उलगडा होताना दिसत नाही.

सध्या सरकारवर विनाकारण होणारी चिखलफेक अनेक प्रश्नांना जन्म देते. अर्थात तेरी भी चूप-मेरी भी चूप असा हा व्यवहार असल्यामुळे पोलिसांवर तोंडसुख घेणाऱ्यांचे काही आतबट्ट्याचे व्यवहार समोर येतील, असे नाही. पण उगाच मुंबई असुरक्षित असल्याची ओरड करून या शहराला बदनाम करण्याचा प्रयत्न कोणी करू नये, असे ठणकावून सांगावेसे वाटते. मुंबई सेफ आहे, काळजी करू नका.. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत. तुमचे धंदे, खंडण्या बंद झाल्यामुळे ती असुरक्षित वाटू लागली आहे एवढेच !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सरकार तपास गांभीर्याने घेत नाही!

## अजित पवार फक्त कागदावर पालकमंत्री असतील : इम्तियाज जलील

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महायुतीच्या सरकारने शनिवारी (१८ जानेवारी) पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली. यामध्ये बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे देण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यातील राजकारण चांगलंच तापलेलं आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेनंतर आणि वाल्मिक कराड खंडणीच्या प्रकरणानंतर मंत्री धनंजय मुंडे यांना बीडचं पालकमंत्री पद देण्यात येऊ नये, अशी मागणी बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आमदारांनी केली होती. यावरून आरोप-प्रत्यारोपाने बीडचं राजकारण ढवळून निघालं. यानंतर अखेर बीडचं पालकमंत्री पद अजित पवार यांच्याकडे देण्यात आलं. मात्र, यावरून आता माजी खासदार इम्तियाज जलील यांनी हल्लाबोल केला आहे. "अजित पवार हे फक्त कागदावरच पालकमंत्री असतील आणि कोणीतरी दुसरं कार्य बजावेल", असा आरोप इम्तियाज जलील यांनी केला आहे.**



"उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी वर्णी लागली, ही एक राजकीय खेळी आहे. अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचं देखील पालकमंत्री पद आहे. खरं तर पुणे एवढं मोठं शहर आहे त्यामुळे पुण्याचं पालकत्व सांभाळणं म्हणजे एवढं सोप नाही. मात्र, असं असतानाही पुणे जिल्ह्याबरोबर अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद स्वीकारलं. त्यामुळे अजित पवार हे फक्त कागदावरच पालकमंत्री असतील आणि कोणीतरी दुसरं कार्य बजावेल. हे सर्व लोकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचं काम करत आहेत", अशी टीका इम्तियाज जलील यांनी केली आहे."बीड जिल्ह्यात सर्वात जास्त क्राईमच्या घटना घडत असल्याचं दिसून येत आहे. त्या ठिकाणी कशा पद्धतीने गुन्हेगारांच्या टोळ्या आहेत, वाळू माफिया आहेत. हे सर्वांना माहिती आहे. मात्र, प्रश्न असा आहे की हे महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांना का माहिती नसतं? पोलिसांना का काही माहिती नसतं? प्रशासनाला काही माहिती नसतं. महाराष्ट्रात सध्या जे काही घडतंय त्याला सरकारचं संरक्षण आहे का? असा प्रश्न पडतो", असं इम्तियाज जलील यांनी म्हटलं आहे."संतोष देशमुख यांच्या हेत्येच्या घटनेचा तपास सरकार गांभीर्याने घेतंय असं वाटत नाही. कारण जे त्या घटनेशी संबंधित लोक आहेत ते सरकारशी जोडले गेलेले लोक आहेत. आता लोक एका वाल्मिक कराडला टार्गेट करत आहेत. पण माझं असं म्हणणं आहे, महाराष्ट्रात असे अनेक वाल्मिक कराड तयार करण्यात आलेले आहेत. ज्यांना सरकारचं संरक्षण आहे. ज्यांना पैसा पुरवण्यात येत आहे. कारण एका माणूस त्याला पोलिसांची भिती नसते. प्रशासनाची भिती नसते. न्यायप्रणालीला मानत नाही. मग त्याला कोणाचं संरक्षण आहे?", असा सवाल इम्तियाज जलील यांनी केला."उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी वर्णी लागली, ही एक राजकीय खेळी आहे. अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचं देखील पालकमंत्री पद आहे. खरं तर पुणे एवढं मोठं शहर आहे त्यामुळे पुण्याचं पालकत्व सांभाळणं म्हणजे एवढं सोप नाही. जिल्ह्याबरोबर अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद स्वीकारलं. त्यामुळे अजित पवार हे फक्त कागदावरच पालकमंत्री असतील आणि कोणीतरी दुसरं कार्य बजावेल. हे सर्व लोकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचं काम करत आहेत", अशी टीका इम्तियाज जलील यांनी केली आहे."बीड जिल्ह्यात सर्वात जास्त क्राईमच्या घटना घडत असल्याचं दिसून येत आहे. त्या ठिकाणी कशा पद्धतीने गुन्हेगारांच्या टोळ्या आहेत, वाळू माफिया आहेत. हे सर्वांना माहिती आहे. मात्र, प्रश्न असा आहे की हे महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांना का माहिती नसतं? पोलिसांना का काही माहिती नसतं?

### पालकत्व सांभाळणं म्हणजे सोप नाही

"उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी वर्णी लागली, ही एक राजकीय खेळी आहे. अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचं देखील पालकमंत्री पद आहे. खरं तर पुणे एवढं मोठं शहर आहे त्यामुळे पुण्याचं पालकत्व सांभाळणं म्हणजे एवढं सोप नाही. मात्र, असं असतानाही पुणे जिल्ह्याबरोबर अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद स्वीकारलं. त्यामुळे अजित पवार हे फक्त कागदावरच पालकमंत्री असतील आणि कोणीतरी दुसरं कार्य बजावेल. हे सर्व लोकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचं काम करत आहेत", अशी टीका इम्तियाज जलील यांनी केली आहे."बीड जिल्ह्यात सर्वात जास्त क्राईमच्या घटना घडत असल्याचं दिसून येत आहे. त्या ठिकाणी कशा पद्धतीने गुन्हेगारांच्या टोळ्या आहेत, वाळू माफिया आहेत. हे सर्वांना माहिती आहे. मात्र, प्रश्न असा आहे की हे महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांना का माहिती नसतं? पोलिसांना का काही माहिती नसतं? प्रशासनाला काही माहिती नसतं. महाराष्ट्रात सध्या जे काही घडतंय त्याला सरकारचं संरक्षण आहे का? असा प्रश्न पडतो", असं इम्तियाज जलील यांनी म्हटलं आहे."संतोष देशमुख यांच्या हेत्येच्या घटनेचा तपास सरकार गांभीर्याने घेतंय असं वाटत नाही.

---

# आगामी निवडणुकीत महायुती फुटणार?

## भाजपाची ताकद वाढली पाहिजे : खासदार अशोक चव्हाण

।कोल्हापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्यात येत्या काही महिन्यांत स्थानिक संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसाठी पक्षबांधणी सुरू झाली आहे. नेत्यांनी कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी सुरू केल्या असून मोर्चेबांधणीलाही सुरुवात झाली आहे. दरम्यान, भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण यांनी भारतीय जनता पक्षाच्या सदस्य नोंदणी अभियानाचा आढावा घेण्यासाठी नांदेड येथे बैठक घेतली होती.** या बैठकीत त्यांनी स्थानिक



स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत स्वबळाचा नारा दिला आहे. कार्यकर्त्यांना संबोधित करताना अशोक चव्हाण म्हणाले, "आमची ताकद नांदेड शहर आणि जिल्ह्यात आहे. त्या शहरांत राष्ट्रवादीचे आणि शिवसेनेची ताकद असली तरीही तिथे भाजपाची ताकद वाढली पाहिजे, हे आपण लक्षात ठेवलं पाहिजे.

आगामी काळात प्रत्येक क्षणाला सैन्य तयार असलं पाहिजे. आम्ही घटकपक्षाच्या विरोधात बोलत नाहीत. शेवटी आमचाही पक्ष आहे. आमचा पक्ष वाढवण्याचा आम्हाला अधिकार आहे. आपली ताकद निश्चित आहे."ते पुढे म्हणाले, "आपली ताकद निश्चितच अधिक आहे. प्रमुख राज्यात आपल्या पक्षाचे नेते आहेत. देशाचे पंतप्रधान आपल्या पक्षाचे आहेत. शेवटी आपला पक्ष वाढला तरच सर्व राहणार आहे. सर्वाधिक आमदार आपले आहेत, त्यामुळे मुख्यमंत्री आपला आहे. आगामी काळात परिस्थिती जी काही निर्माण होईल, त्या युद्धाला तयार राहिलं पाहिजे." "त्यामुळे सर्व पातळ्यांवर आपली तयारी सर्व मतदारसंघात आहेत. याचा अर्थ आपण त्यांच्या विरोधात लढतोय असं नाही. घटकपक्षांच्या विरोधात लढतोय असं नाही. युती आहे तर जागा सोडून द्याल, तर असं काही ठरलेलं नाही. तुम्ही जर म्हणालात तर स्वबळावर आम्ही निवडणुका लढवू शकतो. हा निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे. तुमचं मत आपण आपल्या वरिष्ठांना कळवू.

### निवडणुकीत स्वबळाचा दिला नारा

आपल्याला जिथे पोषक वातावरण आहे, त्या जागा आपल्याला सोडायच्या नाहीत. त्या जागा अधिकाधिक प्रमाणावर लढायचं आहे. तुम्ही सांगा त्याप्रमाणे आपण निवडणुकीची तयारी करू", असं अशोक चव्हाण म्हणाले.राज्यात येत्या काही महिन्यांत स्थानिक संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसाठी पक्षबांधणी सुरू झाली आहे. नेत्यांनी कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी सुरू केल्या असून मोर्चेबांधणीलाही सुरुवात झाली आहे. दरम्यान, भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण यांनी भारतीय जनता पक्षाच्या सदस्य नोंदणी अभियानाचा आढावा घेण्यासाठी नांदेड येथे बैठक घेतली होती. या बैठकीत त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत स्वबळाचा नारा दिला आहे.

# ओलिसांची सुटका होईल, युद्ध थांबेल!

## सुरक्षेच्या मुद्द्यांवर मोठ्या प्रमाणावर आव्हाने निर्माण झाली होती

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गाझामध्ये तब्बल 15 महिन्यांपासून सुरू असलेल्या इस्रायल-हमास संघर्षावर अखेर युद्धविरामाची घोषणा करण्यात आली आहे. 16 जानेवारी 2025 रोजी दोन्ही पक्षांनी युद्ध थांबवण्यावर सहमती दर्शवली असून, हा युद्धविराम रविवारपासून लागू होणार आहे. या युद्धामुळे 46 हजारांहून अधिक पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला असून, मोठ्या प्रमाणावर विध्वंस आणि मानवी हानी झाली आहे.**




गाझामधील युद्ध थांबण्याच्या काही तास आधीही इस्रायली हवाई हल्ल्यांनी परिस्थिती तणावपूर्ण बनवली. गाझा आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, शनिवारी झालेल्या हवाई हल्ल्यांत 23 मृतदेह रुग्णालयात आणण्यात आले. दक्षिण गाझातील खान युनिस येथे झालेल्या एका हवाई हल्ल्यात मृत्यू पावलेल्या महिलेबाबत बोलताना तिच्या भावाने प्रश्न उपस्थित केला, “युद्धविराम जाहीर झाला.

मध्यपूर्वेतील या संघर्षावर आंतरराष्ट्रीय समुदाय, विविध देश आणि संघटनांनी सतत दबाव आणून हा युद्धविराम शक्य केला आहे. या युद्धाने पॅलेस्टाईन नागरिकांचे जगणे कठीण केले होते. लाखो लोक बेघर झाले, तर इस्रायली बाजूलाही मानवी आणि आर्थिक हानी सहन करावी लागलीया युद्धविरामाचा उद्देश दोन्ही पक्षांना शांततामय वाटचाल करण्यासाठी वेळ देणे हा आहे. कराराअंतर्गत, बंदिवानांची सुटका करण्यासह दोन्ही बाजूंनी हिंसाचार थांबवण्याचे वचन दिले आहे. मात्र, हा करार किती काळ टिकेल, याबाबत शंका कायम आहे. गाझामधील नागरिकांनी या कराराला काहीसा दिलासा मानले असले तरी दीर्घकालीन शांतता प्रस्थापित करण्यासाठी अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. गाझामधील परिस्थिती अत्यंत बिकट बनली आहे. हजारो लोकांचे मृत्यू, संपूर्ण शहरे उद्ध्वस्त होणे, आणि मुलभूत सेवांची कमतरता यामुळे नागरिकांचे जगणे कठीण बनले आहे. इस्रायलच्या बाजूनेही सुरक्षेच्या मुद्द्यांवर मोठ्या प्रमाणावर आव्हाने निर्माण झाली आहेत. या युद्धविरामावरून दीर्घकालीन शांतीसाठीच्या चर्चांना गती मिळेल अशी अपेक्षा आहे. मात्र, दोन्ही बाजूंतील अविश्वास, राजकीय मतभेद, आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रस्थापित होणाऱ्या बदलत्या समीकरणांमुळे याचा किती परिणाम होईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. गाझामधील युद्धबंदीला काहीजण दिलासा म्हणून पाहत असले, तरी काही लोक या करारावर नाराजी व्यक्त करत आहेत. “हा करार फक्त तात्पुरता आहे, आणि दीर्घकालीन शांतीसाठी अजूनही काहीच निश्चित झालेले नाही,” असे एका पॅलेस्टिनी नागरिकाने सांगितले. इस्रायल-हमास युद्धविरामाचा करार हा एका मोठ्या संकटातून बाहेर पडण्याचा तात्पुरता प्रयत्न आहे. मात्र, गाझातील सामान्य नागरिकांचे आयुष्य पुन्हा पूर्ववत होण्यासाठी आणि या संघर्षाचा कायमस्वरूपी अंत करण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवरील प्रयत्नांची आवश्यकता आहे.

गाझामधील युद्ध थांबण्याच्या काही तास आधीही इस्रायली हवाई हल्ल्यांनी परिस्थिती तणावपूर्ण बनवली. गाझा आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, शनिवारी झालेल्या हवाई हल्ल्यांत 23 मृतदेह रुग्णालयात आणण्यात आले. दक्षिण गाझातील खान युनिस येथे झालेल्या एका हवाई हल्ल्यात मृत्यू पावलेल्या महिलेबाबत बोलताना तिच्या भावाने प्रश्न उपस्थित केला, “युद्धविराम जाहीर झाला.
मध्यपूर्वेतील या संघर्षावर आंतरराष्ट्रीय समुदाय, विविध देश आणि संघटनांनी सतत दबाव आणून हा युद्धविराम शक्य केला आहे. या युद्धाने पॅलेस्टाईन नागरिकांचे जगणे कठीण केले होते.

### युद्धविरामाचे उद्दिष्ट आणि आव्हाने

लाखो लोक बेघर झाले, तर इस्रायली बाजूलाही मानवी आणि आर्थिक हानी सहन करावी लागलीया युद्धविरामाचा उद्देश दोन्ही पक्षांना शांततामय वाटचाल करण्यासाठी वेळ देणे हा आहे. कराराअंतर्गत, बंदिवानांची सुटका करण्यासह दोन्ही बाजूंनी हिंसाचार थांबवण्याचे वचन दिले आहे. मात्र, हा करार किती काळ टिकेल, याबाबत शंका कायम आहे. गाझामधील नागरिकांनी या कराराला काहीसा दिलासा मानले असले तरी दीर्घकालीन शांतता प्रस्थापित करण्यासाठी अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. गाझामधील परिस्थिती अत्यंत बिकट बनली आहे. हजारो लोकांचे मृत्यू, संपूर्ण शहरे उद्ध्वस्त होणे, आणि मुलभूत सेवांची कमतरता यामुळे नागरिकांचे जगणे कठीण बनले आहे. इस्रायलच्या बाजूनेही सुरक्षेच्या मुद्द्यांवर मोठ्या प्रमाणावर आव्हाने निर्माण झाली आहेत. या युद्धविरामावरून दीर्घकालीन शांतीसाठीच्या चर्चांना गती मिळेल अशी अपेक्षा आहे. मात्र, दोन्ही बाजूंतील अविश्वास, राजकीय मतभेद, आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रस्थापित होणाऱ्या बदलत्या समीकरणांमुळे याचा किती परिणाम होईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# फिफा वर्ल्डकपआधी धक्कादायक निर्णय

## मोरोक्कोत 3 दशलक्ष रस्त्यावरील श्वानांचा जाणार बळी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मोरोक्कोमध्ये फिफा वर्ल्डकप 2030 च्या तयारीसाठी 3 दशलक्ष रस्त्यावरील श्वान मारण्याचा निर्णय घेतला गेला आहे. या धक्कादायक निर्णयामुळे प्राणीप्रेमी आणि हक्कांसाठी लढणाऱ्या संघटनांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे. शहर सुशोभित करण्याच्या नावाखाली करण्यात येणाऱ्या या क्रूर निर्णयावर जगभरात टीका होत आहे.**

फिफा वर्ल्डकपसारख्या भव्य स्पर्धेच्या आयोजनामुळे मोरोक्कोवर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिमा उंचावण्याचा दबाव आहे. त्यासाठी शहरांना स्वच्छ आणि आकर्षक बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मात्र, हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी 3 दशलक्ष भटक्या श्वानांना मारण्याचा निर्णय दुर्दैवी आहे. अहवालांनुसार, मोरोक्कोमध्ये दरवर्षी सुमारे 3 लाख रस्त्यावरील श्वान मारले जातात. मात्र, फिफा वर्ल्डकपच्या आयोजनामुळे ही संख्या झपाट्याने वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या निर्णयामुळे प्राणी हक्कांसाठी लढणाऱ्या संघटनांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. श्वानांचा असा मोठ्या प्रमाणावर बळी देणे हे अत्यंत क्रूर असल्याचे



मत अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे. शहरांचे स्वरूप सुधारण्यासाठी आणि स्वच्छता राखण्यासाठी श्वानांच्या हत्या करणे हा पर्याय योग्य आहे का, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. फिफा वर्ल्डकप हा केवळ फुटबॉलचा खेळ नसून तो जगभरातील विविधतेचा उत्सव आहे. जगभरातून कोट्यवधी लोक या स्पर्धेकडे आकर्षित होतात. मोरोक्कोसाठी हा कार्यक्रम जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करण्याची एक मोठी संधी आहे. यजमान देश म्हणून मोरोक्कोला प्रेक्षकांसाठी भव्य अनुभव तयार करण्याची जबाबदारी आहे. मात्र, त्यासाठी असे वादग्रस्त आणि अमानवी निर्णय घेणे योग्य ठरते का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. फिफा वर्ल्डकपच्या आयोजनासाठी मोरोक्कोने स्वच्छता मोहिमेअंतर्गत श्वानांच्या बळीचा मार्ग अवलंबणे जागतिक स्तरावर चर्चेचा विषय बनला आहे.

### पर्यायी उपाययोजना आवश्यक

यामुळे मोरोक्कोला मोठ्या प्रमाणावर टीकेला सामोरे जावे लागत आहे. जागतिक स्तरावर पर्यावरण संरक्षण आणि प्राणी हक्कांबाबत जागरूकता वाढवण्याचे प्रयत्न सुरू असताना, मोरोक्कोसारखा देश अशा निर्णयाने आंतरराष्ट्रीय समाजात चुकीचा संदेश देत असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. रस्त्यावरील श्वानांचे लसीकरण, त्यांना आश्रयस्थाने उपलब्ध करून देणे किंवा त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी आधुनिक पद्धतींचा अवलंब करणे, हे अधिक योग्य निर्णय ठरू शकतात.

# सलमान खानची 1 तास वाट पाहिली

'बिग बॉस १८'च्या ग्रँड फिनालेला यंदा 'स्काय फोर्स' चित्रपटाच्या निमित्ताने अक्षय कुमार उपस्थित राहणार होता. मात्र, प्रत्यक्ष मंचावर प्रेक्षकांना फक्त सलमान आणि वीर पहारिया एकत्र दिसले. फिनालेसाठी अक्षय कुमार विशेष पाहुणा म्हणून उपस्थित राहणार होता. पण, समोर आलेल्या वृत्तांनुसार, हा बहुप्रतीक्षित सेगमेंट नियोजित वेळेनुसार झाला नाही.अक्षय कुमार सलमानसह 'स्काय फोर्स' चित्रपटाचा प्रमोशन सेगमेंट शूट करण्यासाठी सेटवर वेळेत उपस्थित राहिला होता. अक्षय कुमार त्याच्या वक्तशीरपणासाठी ओळखला जातो. मात्र, सलमान खानला सेटवर येण्यास उशीर झाल्याने अक्षय अखेर सेगमेंट शूट न करताच निघून गेला. 'इंडियन एक्स्प्रेस'ला सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सलमानबरोबर शूटिंग करण्यासाठी खिलाडी कुमार दुपारी बरोबर २:१५ वाजता 'बिग बॉस १८'च्या सेटवर पोहोचला होता. तथापि, एक तासाहून अधिक वाट पाहिल्यानंतर, इतर कामांमुळे अक्षयने सेट सोडण्याचा निर्णय घेतला. सलमान खान संध्याकाळी ६:३० वाजता सेटवर पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. हिंदुस्तान टाईम्समधील वृत्तानुसार, अक्षय आणि सलमान यांनी एकमेकांशी फोनवर बोलणं केलं असून भविष्यात एखाद्या कार्यक्रमाला एकत्र येऊ अशी चर्चा दोघांमध्ये झालेली आहे.अक्षय कुमार सेटवर उपस्थित नसला तरी, या सलमानसह शूटिंग करण्यासाठी अक्षयचा 'स्काय फोर्स'मधील सह-कलाकार आणि नवोदित अभिनेता वीर पहारिया 'बिग बॉस'च्या मंचावर उपस्थित राहिला होता.दरम्यान, 'स्काय फोर्स' हा सिनेमा येत्या २४ जानेवारीला सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. यामध्ये अक्षय आणि वीर पहारिया यांच्यासह सारा अली खान प्रमुख भूमिकेत झळकणार आहे.

# 'इमर्जन्सी' चित्रपट आवडला



कंगना रणौत दिग्दर्शित 'इमर्जन्सी' चित्रपट नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाकडून (CBFC/ सेन्सॉर बोर्डाकडून ) प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे या सिनेमाच्या प्रदर्शनाला विलंब झाला होता. चित्रपटातील काही दृश्यावर आक्षेप घेतले गेल्यामुळे अनेक काळापासून हा चित्रपट रखडला होता. अखेर सेन्सॉर बोर्डाने सिनेमाला प्रमाणपत्र दिल्यावर संपूर्ण देशभरात चित्रपट प्रदर्शित झालेला आहे. कंगनाने या सिनेमाच्या स्पेशल शोचं आयोजन केलं होतं. या शोला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थिती लावली होती.चित्रपट पाहिल्यावर मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला, ते म्हणाले, "इमर्जन्सी' या चित्रपटाचा स्पेशल शो मी पाहिला. 'इमर्जन्सी' हा आपल्या देशाच्या इतिहासातील असा एक अध्याय आहे ज्यामुळे अनेक नागरिकांच्या मूलभूत हक्कांचं उल्लंघन झालं होतं. भारताच्या संविधानाचं पालन केलं गेलं नाही, लाखो नेते दोन वर्षांहून अधिक काळ कारागृहात होते. ज्याप्रकारे त्या काळात जनतेवर अत्याचार झाला होता, या सगळ्या गोष्टी चित्रपटात प्रभावीपणे मांडल्या आहेत.

# एजे लीलाची मकर संक्रांत खास

एजे व लीला ही पात्रे त्यांच्या वेगळेपणामुळे, त्यांच्यातील केमिस्ट्रीमुळे प्रेक्षकांची लाडकी बनली आहेत. 'नवरी मिळे हिटलरला' मालिकेतील ही पात्रे सतत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतात. तसेच भरभरून मनोरंजनही करतात. सध्या मालिकेत एजे व लीलाची प्रेमकहाणी पाहायला मिळत आहे. एजे लीलासाठी विविध गोष्टी करीत असून, तो तिची काळजी घेत असल्याचे दिसते. आता ते पहिली मकर संक्रांत एकत्र साजरी करणार आहेत. त्यासाठी एजे लीलासाठी खास तयारी करणार असल्याचे समोर आलेल्या प्रोमोमध्ये पाहायला मिळते. झी मराठी वाहिनीने सोशल मीडियावर नवरी मिळे हिटलरला या मालिकेचा प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की, लीला तिच्या सासरी आहे आणि ती एजेला शोधत आहे. एजे मात्र लीलाच्या माहेरी गेला आहे. तो त्यांच्या स्वयंपाकघरात काहीतरी बनवत असल्याचे दिसत आहे. लीलाचे वडील म्हणतात की, एजे काय करायचं ते आम्हाला सांगा. आम्ही करतो ना. त्यानंतर रेवती एजेला विचारते की, तुम्ही काय करताय ते तरी सांगा. त्यावर एजे म्हणतो, "हलव्याचे दागिने. लीलाची पहिली संक्रांत आहे आणि तिचे दागिने मी स्वत:च बनवतोय. त्यानंतर रेवती यशला व्हिडीओ कॉलवर सांगते की, यश एजे स्वत:च्या हातांनी ताईसाठी हलव्याचे दागिने बनवीत आहेत.मालिकेत दाखविल्याप्रमाणे, नवरी मिळे हिटलरला या मालिकेत सध्या लीला व एजेची प्रेमकथा पाहायला मिळत आहे. एजेला तो लीलाच्या प्रेमात पडला आहे, याची जाणीव झाली आहे. या सगळ्यात लीलाच्या आयुष्यात मन्या नावाची व्यक्ती आली आहे. खरे तर हा सरस्वतीचा भाऊ विक्रांत आहे, जो वेशभूषा बदलून आला आहे. लीला व एजे यांच्यातील जवळीक वाढत असताना हा मन्या त्यांच्या आयुष्यात सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने डोकावताना दिसतो. आता मालिकेत पुढे काय होणार, लीलाचा मकर संक्रांतीचा सण कसा साजरा होणार, हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.



# बापाच्या काळजीने मुलांची अवस्था वाईट

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर गुरुवारी पहाटे मुंबईतील त्याच्या वांद्रे पश्चिम येथील विसस्थानावर एका अज्ञात व्यक्तीने चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सैफवर लीलावती रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तसेच आता त्याची प्रकृती स्थिर असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं आहे.दरम्यान या घटनेनंतर अनेक सेलिब्रिटींपासून ते राजकीय नेत्यांपर्यंत सर्वांनी हा प्रकार धक्कादायक असल्याचं म्हटलं आहे. सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याचंही त्यांनी म्हटल आहे. दरम्यान ही घटना समजताच अनेकजण हॉस्पिटलमध्ये सैफची विचारपूस करण्यासाठी गेल्याचंही समोर आलं आहे.सैफला रुग्णालयात



दाखल केल्यानंतर करीनाचाही एक व्हिडीओ समोर आला आहे. ज्यामध्ये ती अतिशय घाबरलेल्या अन् गोंधळेल्या अवस्थेत दिसत आहे. तर आता सैफच्या दोन्ही मुलांचा म्हणजे सारा अली खान आणि इब्राहिम अली खान यांचाही हॉस्पिटलमधील एक व्हिडीओ समोर आला आहे.या व्हिडीओमध्ये इब्राहिम आणि सारा घाई-घाईत आपल्या कारमधून उतरून धावत हॉस्पिटलच्या आत जाताना दिसत आहेत. दोघांच्याही चेहऱ्यावर वडिलांची काळजी आणि चिंता स्पष्टपणे दिसून येत आहे. तसेच या व्हिडीओवरून लेक अन् मुलगा वडिलांच्या काळजीने अस्वस्थ झाल्याचं दिसत आहे.

# टीम इंडियाचा 26 बॉलमध्येच विजय!

## विंडीजचा 9 विकेट्सने धुव्वा, मुंबईकर सानिका चाळके चमकली

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**निकी प्रसाद हीच्या नेतृत्वात अंडर 19 वूमन्स टी 20 वर्ल्ड कप 2025 स्पर्धेत अप्रतिम सुरुवात केली आहे. टीम इंडियाने विजयी सुरुवात केली आहे. महिला ब्रिगेडने वेस्ट इंडीजवर 9 विकेट्सने दणदणीत विजय मिळवला आहे. विंडीजने विजयासाठी दिलेलं 45 धावांचं माफक आव्हान टीम इंडियाने 1 विकेट गमावून 94 बॉलआधीच पूर्ण केलं. टीम इंडियाने 4.2 ओव्हरमध्ये 1 विकेट गमावून 47 धावा केल्या. टीम इंडियासाठी उपकर्णधार आणि मुंबईकर फलंदाज सानिका चाळके हीने सर्वाधिक धावा केल्या. तर जी कामालिनी हीने सानिकाला चांगली साथ दिली. या जोडीने टीम इंडियाला झटपट विजय मिळवून दिला.**




गोंगाडी तृषा हीने टीम इंडियाच्या डावातील पहिल्याच बॉलवर फोर ठोकून कडक सुरुवात करुन दिली. मात्र गोंगाडी दुसऱ्याच बॉलवर आऊट झाली. मात्र त्यानंतर जी कामालिनी आणि सानिका चाळके या दोघींनी 43 धावांची नाबाद आणि विजयी भागीदारी केली. सानिकाने 11 बॉलमध्ये 3 फोरसह नॉट आऊट 18 रन्स केल्या. तर कामालिनी हीने 13 चेंडूत 3 चौकारांसह नाबाद 16 धावांचं योगदान दिलं. त्याआधी टीम इंडियाने टॉस जिंकला. कॅप्टन निकी प्रसाद हीने विंडीजला बॅटिंगसाठी भाग पाडलं. भारतीय गोलंदाजांनी हा निर्णय योग्य ठरवत विंडीजला 13.2 ओव्हरमध्ये 44 धावांवर गुंडाळलं. विंडीजसाठी केनिका कॅसार हीने सर्वाधिक 15 धावा केल्या. तर असाबी कॅलेंडर हीने 12 धावांचं योगदान दिलं. एकूण 5 जणांना भोपळाही फोडता आला नाही. तर उर्वरित फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांसमोर गुडघे टेकले. सिसोदीया हीने सर्वाधिक 3 विकेट्स मिळवल्या.

तर जोशिथा व्ही जे आणि आयुषी शुक्ला या दोघींनी प्रत्येकी 2-2 विकेट्स मिळवल्या. तर उर्वरित 3 विकेट्स या रन आऊटद्वारे मिळवल्या. अंडर 19 वूमन्स वेस्ट इंडिज प्लेइंग इलेव्हन : समारा रामनाथ (कर्णधार), असाबी कॅलेंडर, नैजान्नी कंबरबॅच, जहझारा क्लॅक्स्टन, ब्रायना हॅरीचरण, केनिका कॅसार, अबीगेल ब्राइस, क्रिस्टन सदरलँड (विकेटकीपर), अमृता रामताहल, अमिया गिल्बर्ट आणि सेलेना रॉस. अंडर 19 वूमन्स टीम इंडिया प्लेइंग इलेव्हन: निकी प्रसाद (कर्णधार), सानिका चाळके (उपकर्णधार), गोंगाडी तृषा, जी कामालिनी (विकेटकीपर), भाविका अहिरे, मिथिला विनोद, आयुषी शुक्ला, जोशिता वीजे, परुनिका सिसौदिया, शबनम एमडी शकील आणि सोनम यादव. गोंगाडी तृषा हीने टीम इंडियाच्या डावातील पहिल्याच बॉलवर फोर ठोकून कडक सुरुवात करुन दिली. मात्र गोंगाडी दुसऱ्याच बॉलवर आऊट झाली. मात्र त्यानंतर जी कामालिनी आणि सानिका चाळके या दोघींनी 43 धावांची नाबाद आणि विजयी भागीदारी केली.

सानिकाने 11 बॉलमध्ये 3 फोरसह नॉट आऊट 18 रन्स केल्या. तर कामालिनी हीने 13 चेंडूत 3 चौकारांसह नाबाद 16 धावांचं योगदान दिलं. त्याआधी टीम इंडियाने टॉस जिंकला. कॅप्टन निकी प्रसाद हीने विंडीजला बॅटिंगसाठी भाग पाडलं. भारतीय गोलंदाजांनी हा निर्णय योग्य ठरवत विंडीजला 13.2 ओव्हरमध्ये 44 धावांवर गुंडाळलं. विंडीजसाठी केनिका कॅसार हीने सर्वाधिक 15 धावा केल्या. तर असाबी कॅलेंडर हीने 12 धावांचं योगदान दिलं. एकूण 5 जणांना भोपळाही फोडता आला नाही. तर उर्वरित फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांसमोर गुडघे टेकले. सिसोदीया हीने सर्वाधिक 3 विकेट्स मिळवल्या. तर जोशिथा व्ही जे आणि आयुषी शुक्ला या दोघींनी प्रत्येकी 2-2 विकेट्स मिळवल्या.

### महिला ब्रिगेडची विजयी सलामी

निकी प्रसाद हीच्या नेतृत्वात अंडर 19 वूमन्स टी 20 वर्ल्ड कप 2025 स्पर्धेत अप्रतिम सुरुवात केली आहे. टीम इंडियाने विजयी सुरुवात केली आहे. महिला ब्रिगेडने वेस्ट इंडीजवर 9 विकेट्सने दणदणीत विजय मिळवला आहे. विंडीजने विजयासाठी दिलेलं 45 धावांचं माफक आव्हान टीम इंडियाने 1 विकेट गमावून 94 बॉलआधीच पूर्ण केलं. टीम इंडियाने 4.2 ओव्हरमध्ये 1 विकेट गमावून 47 धावा केल्या. टीम इंडियासाठी उपकर्णधार आणि मुंबईकर फलंदाज सानिका चाळके हीने सर्वाधिक धावा केल्या. तर जी कामालिनी हीने सानिकाला चांगली साथ दिली. या जोडीने टीम इंडियाला झटपट विजय मिळवून दिला. भारतीय गोलंदाजांनी हा निर्णय योग्य ठरवत विंडीजला 13.2 ओव्हरमध्ये 44 धावांवर गुंडाळलं. विंडीजसाठी केनिका कॅसार हीने सर्वाधिक 15 धावा केल्या. तर असाबी कॅलेंडर हीने 12 धावांचं योगदान दिलं. एकूण 5 जणांना भोपळाही फोडता आला नाही.

---

# भारत खो-खो वर्ल्ड चॅम्पियन

## महिला संघासह पुरुष संघाची सुवर्णपदकाला गवसणी

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पहिलाच खो-खो विश्वचषक भारतात खेळवला गेला आणि महिला-पुरुष दोन्ही संघांमध्ये भारताच्या संघाने इतिहास घडवला आहे. महिला खो खो संघानंतर पुरूष खो-खो संघानेही नेपाळला नमवत विश्वचषक जिंकला. भारतीय पुरुष संघाची संपूर्ण स्पर्धेत अपराजित होता आणि भारताच्या पुरूष संघाने अंतिम फेरीतही विजय मिळवला. टीम इंडियाने नेपाळविरुद्धचा सामना ५४-३६ अशा फरकाने जिंकला.**



भारतीय संघ अशारितीने खो खो वर्ल्ड चॅम्पियन ठरला आहे. महिला खो खो संघाने नेपाळचा ७८-४० च्या फरकाने पराभव केला. तर पुरूष संघाने नेपाळचा ५४-३६ च्या फरकाने सामना जिंकला. नेपाळच्या पुरूष संघाने भारताला चांगलीच टक्कर दिली पण अखेरीस भारताने बाजी मारली. खो-खो विश्वचषक २०२५ पुरुषांच्या अंतिम सामन्यात, भारतीय संघाची नेपाळविरुद्ध चांगली सुरुवात झाली, ज्यामध्ये त्यांनी पहिल्या टर्नमध्येच २६ गुण मिळवले आणि नेपाळ संघाला खाते उघडण्याची संधीही दिली नाही. दुसऱ्या टर्नमध्ये नेपाळ संघाने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. ज्यात त्यांनी एकूण १८ गुण मिळवले परंतु टीम इंडियाने ८ गुणांची आघाडी कायम राखली. तिसऱ्या टर्नमध्ये भारतीय पुरुष खो-खो संघाने शानदार पुनरागमन केले, ज्यामध्ये त्यांनी नेपाळला विजेतेपदाच्या सामन्यातून पूर्णपणे बाहेर केले आणि त्यांचे गुण ५०च्या पुढे नेले. भारतीय पुरुष खो-खो संघाने नेपाळविरुद्धच्या अंतिम सामन्यात पहिल्या तीन टर्नमध्ये आपली आघाडी कायम ठेवली होती, तर चौथ्या टर्नमध्येही चांगली कामगिरी करत५४-३६ अशा फरकाने सामना जिंकला. भारतीय पुरुष खो-खो संघाने या विश्वचषकात दुसऱ्यांदा नेपाळ संघाचा पराभव केला आहे, याआधी गट सामन्यात दोन्ही संघ आमने-सामने आले होते.

### चौथ्या टर्नमध्येही चांगली कामगिरी

पुरुषांच्या खो-खो विश्वचषकाच्या पहिल्याच सीझनमध्ये एकूण २० संघांनी भाग घेतला होता. यातून भारताच्या संघाने बाजी मारत वर्ल्डकप ट्रॉफी जिंकली आहे.तिसऱ्या टर्नमध्ये भारतीय पुरुष खो-खो संघाने शानदार पुनरागमन केले, ज्यामध्ये त्यांनी नेपाळला विजेतेपदाच्या सामन्यातून पूर्णपणे बाहेर केले आणि त्यांचे गुण ५०च्या पुढे नेले. भारतीय पुरुष खो-खो संघाने नेपाळविरुद्धच्या अंतिम सामन्यात पहिल्या तीन टर्नमध्ये आपली आघाडी कायम ठेवली होती, तर चौथ्या टर्नमध्येही चांगली कामगिरी करत५४-३६ अशा फरकाने सामना जिंकला.

# इंटरनॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेमध्ये स्वरांजली पाटील हिला सुवर्णपदक !

## वाकडमधील इंदिरा नॅशनल स्कूल विद्यार्थीनीचे उल्लेखनीय यश

**। पिंपरी-चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

शालेय शिक्षण जीवनातील स्पर्धा परीक्षा अर्थात इंटरनॅशनल ऑलिम्पियाड ऑफ इंग्लिश लीग-2025 मध्ये कु. स्वरांजली संजय पाटील हिने सुवर्णपदक पटकावले. वाकड येथील इंदिरा नॅशनल स्कूलमध्ये इयत्ता 3 रीमध्ये स्वरांजली शिक्षण घेत आहे. तीला एकूण 84 गुण मिळाले असून, क्लासमध्ये ती अव्वल ठरली आहे. तसेच, परीक्षेच्या दुसऱ्या फेरीमध्ये तिचा समावेश झाला आहे. राज्यातील क्रमवारीमध्ये तिचा 209 वा आणि झोनच्या क्रमवारीमध्ये स्वरांजलीने 263 वा क्रमांक पटकावला आहे.

इंग्लिश इंटरनॅशनल ऑलिम्पियाड (EIO) भाषा कौशल्य विकसित करण्याच्या महत्त्वपूर्ण परीक्षापैकी एक आहे. ही एक इंग्रजी व्याकरण आणि भाषा स्पर्धा आहे जी विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयावर असलेल्या ज्ञानावर आधारित मोजते. या परीक्षेत भाग घेण्यासाठी इयत्ता १ ते इयत्ता १० पर्यंतचे विद्यार्थी आमंत्रित केले जातात. ते विविध शाळांमधून आणि विविध बोर्डांमधून असू शकतात. कु. स्वरांजली पाटील हिच्या उल्लेखनीय यशाबद्दल तीचे कौतूक करण्यात येत आहे.

### भाषा कौशल्य सुधारण्यासाठी इंटरनॅशलन ऑलिम्पियाड ...

इंग्लिश इंटरनॅशनल ऑलिम्पियाड (EIO) परीक्षेचा अभ्यासक्रम CBSE, ICSE आणि राज्य बोर्डांद्वारे निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमासारखा आहे. या परीक्षेचा उद्देश विद्यार्थ्यांच्या इंग्रजी ज्ञानाची इतरांच्या तुलनेत चाचणी करणे आहे. याशिवाय, हे विद्यार्थ्यांना वाक्य रचना, भाषेचे घटक, समज यामध्ये प्रावीण बनवते आणि मोठ्या प्रमाणावर त्यांच्या लेखन कौशल्यामध्ये सुधारणा करते. तसेच, विद्यार्थ्यांना



आत्मविश्वासी बनवते आणि त्यांच्या संवाद कौशल्याचा विकास करते. भाषा कौशल्य सुधारण्यासाठी ही परीक्षा महत्त्वपूर्ण ठरत आहे.



# शारीरिक व मानसिक प्रगतीसाठी अभ्यासाबरोबर मैदानी क्रीडाप्रकारही महत्त्वाचे

## महिला बालकल्याण विभागाचे ‘आयडॉल’ व्हा : चैतन्य पुरंदरे

। लोणावळा ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



शारीरिक व मानसिक प्रगतीसाठी अभ्यासाबरोबर मैदानी क्रीडाप्रकारही महत्त्वाचे आहे, अनाथ असल्याची भावना न बाळगता मुलांनी प्रगती करावी व इंडियन आयडॉलप्रमाणे महिला व बालकल्याण विभागाचे ‘आयडॉल’ व्हावे असा सल्ला बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य चैतन्य पुरंदरे यांनी दिला. सरकारच्या महिला व बाल विकास विभाग व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या वतीने मळवली येथे सुरू असलेल्या जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप झाला. यावेळी श्री. पुरंदरे बोलत होते. महिला व बालकल्याण विकास विभागीय उपायुक्त संजय माने, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मनीषा बिरारीस, जिल्हा परिविक्ष अधिकारी दत्तात्रेय कुटे, संपर्क संस्थेचे संस्थापक अमितकुमार बॅनर्जी, होप फॉर चिल्ड्रन संस्थेच्या संस्थापक कॅरोलिन ऑडायर डी वॉल्टर, बालकल्याण समिती अध्यक्ष नंदिता अंबिके, सदस्य पूर्वी जाधव, नवनिता चॅटर्जी आदी व्यासपीठावर उपस्थित होते. शासनाचे अनाथ मुलांसाठी धोरण आहे, केवळ शिक्षण घेऊन मोठे होऊ नका, तुमच्यात जे कलागुण आहेत त्यांना वाव देत स्वतःच्या पायावर उभे रहा असा सल्ला विभागीय उपायुक्त संजय माने यांनी दिला. चार भिंतीच्या आत असलेल्या अनाथ, निराधार मुलांना खुल्या वातावरणात खेळांचा आनंद लुटता यावा, कला गुणांना वाव मिळावा यासाठी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मनीषा बिरारीस म्हणाल्या.